शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया
**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, GONDIA.**
कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र
फोन नं. 07182-238090 ई मेल : gmcgondiya@gmail.com

क्र.शावैमगों/आस्था १,२/पदे भरणे/कं.स्व./जाहिरात/ 6300-02 /२०२२ दिनांक 13 /०९/२०२२

## जाहिरात

विषय :- सहाय्यक प्राध्यापक यांची विविध विषयातील रिक्त पदे कंत्राटी (मानधन) करार तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीमार्फत भरणेबाबत...

राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्यक्रम व दैनदिन रुग्णसेवा सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,गोदींया संस्थेच्या आस्थापने वरील अचिकीत्सालयीन व चिकीत्सालयीन विषयांतील रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापक पदे मा.शासन/ संचालनालय, मुंबई यांचेमार्फत बंधपत्रित उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत/शासन निवड मंडळ अथवा नियमीत उमेदवार अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदानवत होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन खालील अटी व शर्तीच्या अधिन अर्ज मागविण्यात येत आहे.

१) उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी दि.१४/०९/२०२२ ते दि. २२/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून)

२) मुलाखतीचा दिनांक :- **दिनांक २७/०९/२०२२ — सकाळी ११.०० वाजता**

३) मुलाखतीचे ठिकाण :- अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोदीया यांचे दालन

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.gmcgondya.com प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील दर्शविण्यात आलेला विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करुन घ्यावा. तसेच अर्ज परिपुर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र- प्रमाणपत्राच्या छायांकीत साक्षांकीत प्रती जोडाव्यात. अर्ज कार्यालयास जमा करतांना त्यासोबत अर्ज शुल्क रुपये २५०/- कार्यालयातील रोखशाखेत भरुन सदरील पावतीची मुळ प्रत अर्जासोबत सादर करण्यात यावी. उमेदवारांने प्रत्यक्ष येऊन अर्ज कार्यालयास सादर करावा. उमेदवारांनी ऑन लाईन अर्ज सादर करण्यात येऊ नये, ऑन लाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळे प्रमाणपत्रासह साक्षांकीत केलेल्या प्रती सह मुलाखतीच्या ठिकाणी स्वःखर्चाने हजर राहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवारांचा नियुक्ती करीता विचार करण्यात येणार नाही.

..२..

Scanned with CamScanner

संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील १२० दिवसाकरीता भरावयाच्या पदांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | जन औषधवैद्यकशास्त्र | ०२ | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवीत्तर पदवी (एम.डी./एम.एस)<br>२.राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग,नवी दिल्ली यांची मान्यता दिलेल्या शैक्षणीक अर्हता<br>३.वरीष्ठ निवासी या पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे गरजेचे आहे. सर्व साधारण वयोमर्यादा ४० वर्ष व शासन सेवेतील व मागासवर्गीय उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील | रुपये १,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख दहा हजार एकत्रीत ठोक मानधन दरमहा) |
| २ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | | |
| ३ | क्षयरोगशास्त्र | ०१ | | |
| ४ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | | |
| ५ | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०२ | | |
| | एकूण | ०७ | | |

उक्त नमूद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलन्याचे अधिकार प्रशासनास राहील. तक्त्यात नमुद केलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमीत करण्यात येतील.

उमेदवारांची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पंदाकरीता नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १२०-१२० दिवसासाठी असुन, कोणतीही पुर्व सुचना न देता तात्पुरतील कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

**अटी व शर्ती**

१. बंधपत्रित ऊमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
२. वरीष्ठ निवासी या पदाचा एक वर्षाचा अनुभव बंधनकारक राहील. (त्या बाबतचे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावे)
३. सदर उमेदवारांची नियुक्ती ही नियमानुसार सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) या पदाच्या दरमहा एकत्रित ठोक मासिक मानधन वर करण्यात येत आहे. सदरील मानधन संस्थेत मंजुर असलेल्या मुळ अनुदानांतून १० कंत्राटी सेवा या उददीष्टां मधून भागविण्यात येईल.
४. सदरहु नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा इतर संस्थेतुन बदलीने रुजु होईपर्यंत किंवा स्थानिक निवड मंडळामार्फत नियुक्तीने रुजु होईपर्यंत किंवा मा.संचालकाडुन बंधपत्रीय उमेदवार तात्पुरत्या स्वरुपात रुजु होईपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदानवत होईपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत करण्यात येत आहे. तसेच उमेदवार कार्यरत असंताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास व त्यांची सदर पदावरील सेवा असमाधानकारक आढळुन आल्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता त्यांची सेवा कधीही समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांच्याकडे राहील याची नोंद घेण्यात यावी.

..३..

Scanned with CamScanner

५. वयोमर्यादा ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही तसेच मागासवर्गीय उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.
६. त्यांना महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनीयम १९६५ च्या अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यांचे नाव इंडियन मेडिकल रजिस्टरवर असणे आवश्यक आहे.
७. नियुक्तीचे कार्यालयीन आदेश प्राप्त होताच किमान ०७ दिवसाच्या आत विभागात रुजु होणे आवश्यक आहे. जर ०७ दिवसाच्या आत कामावर रुजु झाले नाही तर आपल्या नियुक्तीचे आदेश आपोआप संपुष्टात येईल. याकरीता कार्यालय जवाबदार राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
८. उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रीत सेवा (पी जी बॉन्ड) पुर्ण केला नाही अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
९. उमेदवार या महाविद्यालया व्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना -हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविलेला किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमुद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.
१०. त्यांना नौकरी सोडतांना एक महिन्याची पुर्वसुचना देणे आवश्यक आहे. नौकरी सोडण्याआधी एक महिन्याची पुर्वसुचना न दिल्यास एका महिन्याचे वेतन शासनखाती जमा करावे लागेल. नियुक्ती स्विकारल्यास आपणास वरिल सर्व अटि व शर्ती आपणास मान्य आहे असे समजण्यात येईल. वरिल अटि व शर्तीत आणि पदसंख्येत बदल करण्याचा अधिकार फक्त अधिष्ठाता यांना राहील.
११. सदरची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपात तात्पूरती असल्यामुळे उमेदवारांचा या नियुक्ती आदेशातील पदावर कायम नियुक्तीसाठी कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.
१२. सदर पदावर कार्यरत असतांना आपणास खाजगी व्यावसाय करता येणार नाही.
१३. सहाय्यक प्राध्यापक या पदांवर नियुक्ती संबंधात या पुर्वी ज्यांनी अर्ज/निवेदने सादर केली आहेत त्यांनी नव्याने विहित नमुन्यात अर्जा सादर करणे आवश्यक आहे.

(डॉ.कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोदींया.

प्रति,
१) उपरोक्त संबंधीत सर्व विषयातील प्राध्यापक व विभाग प्रमुख,शावैम,गोदींया
२) वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोदींया
३) सूचना फलक अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोदींया
४) रोखपाल विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोदींया यांना आदेशीत करण्यात येते की, महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक उमेदवारांकडून (शासकीय सुटटी वगळून) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासुन विहित कालावधीत फॉर्म फी रुपये २५०/- (दोनश पन्नास रुपये) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रत,
१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner

अर्ज क्रं............... पावती क्रं..................... दि. /०९/२०२२

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोदींया

### सहाय्ययक प्राध्यापक पदासाठी अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोदींया

पासपोर्ट साईज फोटो

पदांचे व विभागाचे नांव :-

उमेदवाराचे संपुर्ण नाव :-

उमेदवाराचा पत्ता :-

| भ्रमणध्वनी क्रं. :- | पॅन क्रं.:- | आधार कार्ड क्रं. |
|---|---|---|

| जन्म दिनांक :- | तारीख | महिना | वर्षे | मुलाखतीच्या दिवशीचे वय :- | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| योग्य ठिकाणी टीक करावी (√) | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | SBC | OBC | EWS | Open |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत ओळखपत्र (आयडी प्रुफ) जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| जन्माची (वयाची) पडताळणी करण्यासाठी दहावीच्या प्रमाणपत्राची किंवा शाळा सोडल्याचा दाखला | होय | नाही |
| अर्जासोबत चालू आर्थिक वर्षाचे ३१ मार्च पर्यंतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र जोडावे (लागू असल्यास) | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीवर असल्यास तपशिल देऊन नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम,व्दितीय,तृतीय, वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत एमबीबीएस/एम डी/एम एस पदवी प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत एमएमसी तसेच एमसीआय चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| एमएमसी प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युअल) केलेले असावे | होय | नाही |
| अर्जदार हा बंधपत्रित आहे काय ? | होय | नाही |
| असल्यास बंधपत्रित कालावधीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. | होय | नाही |
| बंधपत्रित असल्यास त्यापैकी किती कालावधी सेवा झाली आहे व किती शिल्लक आहे प्रमाणपत्र जोडावे | | |

Scanned with CamScanner

| शैक्षणीक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टककेवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तीर्ण वर्ष एमबीबीएस | | | | |
| २ | एमडी / एमएस | | | | |
| ३ | इतर | | | | |

अटी व शर्ती

अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र (नियुक्ती आदेश व रुजु अहवाल)नसल्यास अर्ज बाद होईल

सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणीक अर्हता व एन एम सी च्या मानकांनुसार असावी

सर्व कागदपत्रे फार्म मधील अनुक्रमा नुसार लावणे

सादर केलेले सर्व कागदपत्रावर स्वत:ची (सेल्फ अटेस्टेड) प्रती स्वाक्षरी करणे

कागदपत्रात त्रुटी आढळल्यास अर्ज बाद होईल (आवश्यक नसलेले प्रमाणपत्र/कागदपत्रे जोडू नये)

अर्ज पूर्ण वाचून पूर्ण भरावा,अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

| सोबत अर्जाची फी रु.२५०/- पावती क्रं. | दिनांक | स्वाक्षरी :-<br>नाव :.....................<br>प्राध्यापक व विभागप्रमुख.........<br>.............<br>(संमती / असंमती) |
|---|---|---|

टिप :- अर्जदाराने अर्जासोबत छायांकीत सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात,अर्जदाराने प्रत्येक पदासाठी/विषयांसाठी स्वतंत्र्य अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायाकिंत प्रतीसह सादर करावा

| अर्ज तपासणी /गुणाक्रम समिती | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|---|---|

| वरील कागदपत्रे योग्य आहेत/नाहीत | सदस्य सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|

| शिफारस मान्य /अमान्य | अधिष्ठाता |
|---|---|

Scanned with CamScanner